शघयो २०१६/प्र.क्र.३१/का-१७.
आदिवासी विकास विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई ४०००३२.
दि.२७ साप्टेंबर, २०१६.

राजगोपाल देवरा
सचिव

विषय:- शबरी घरकुल योजनेच्या अंमलबजावणी बाबत.
संदर्भ :-१. आ.वि. वि. शा.नि. क्र.घरकुल २०१६/प्र.क्र.३७/ का-१७, दि.१५/३/२०१६
२.आ.वि.वि.शा.शु.प.क्र.घरकुल २०१६/प्र.क्र.३७/का-१७, दि.२८/६/२०१६.

प्रिय भारत

केंद्रशासनाच्या दि.१३ एप्रिल,२०१६ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार इंदिरा आवास योजनेचे रुपांतर प्रधान मंत्री आवास योजना - ग्रमिण (PMAY-G) मध्ये करण्यात आले आहे. या योजनेमध्ये लाभार्थी निवड "सामाजिक , आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ (SECC-२०११) " प्राधान्य क्रम यादी (Generated Priority List) मधून करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

शबरी आदिवासी घरकुल योजना ही राज्य शासनाची योजना असून ग्रामिण भागामध्ये याची अंमलबजावणी करण्यासाठी वरील संदर्भ क्र.१ व २ नुसार सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत. असे असतानाही योजना अंमलबजावणी मध्ये फारसी समाधानकारक प्रगती दिसून आलेली नाही. उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयानुसार शबरी आदिवासी घरकुल योजनेचे लाभार्थी निवडीचे निकष स्पष्ट असून ते पुन्हा खालील प्रमाणे आपल्या निदर्शनास आणण्यात येत आहेत.

१. लाभार्थी अनुसूचित जमाती संवर्गातील असावा.
२. लाभार्थी हा बेघर असावा किंवा त्याच्याकडे पक्के घर नसावे.
३. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.१ लक्षचे आत असावे.
४. लाभार्थी "सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ (SECC-२०११) प्राधान्य क्रम यादीच्या (Generated Priority List) निकषा बाहेरील असावा.

प्रधान मंत्री आवास योजना -ग्रामिण (PMAY-G) योजनेअंतर्गत लाभार्थी निवड ही "सामाजिक , आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ (SECC-२०११)"प्राधान्य क्रम यादी (Generated Priority List) या मधून करण्यात येत असल्याने शबरी आदिवासी घरकुल योजनेसाठी वरील क्र.४ चा निकष लावणेत आलेला आहे.

शबरी आदिवासी घरकुल योजनेअंतर्गत १५ ऑगस्ट,२०१६च्या ग्रामसभेमध्ये निवडलेले लाभार्थी हे वरील निकषांनुसार निवडलेले आहेत अशी या कार्यालयाची धारणा आहे. शबरी आदिवासी घरकुल योजना २०१५-१६, २०१६-१७ अंतर्गत प्रती घरकुल आर्थिक मर्यादेबाबत, प्रधान मंत्री आवास योजना -ग्रामीण मधील प्रती घरकुल आर्थिक मर्यादेबाबत ग्रामविकास विभागाने अंतिम आदेश निर्गमित केल्यानंतर या विभागाकडून स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील. या दरम्यान उद्दिष्टांनुसार लाभार्थी निवड, प्रशासकीय मान्यता, बांधकामासाठी निधीचा प्रथम हप्ता PFMS प्रणालीद्वारे वितरीत करणे, इ. प्रक्रिया तात्काल पुर्ण करण्यात याव्यात. व केलेल्या प्रगतीचा अहवाल दरमहा ५ तारखेच्या आत या कार्यालयास पाठविण्यात यावा. आपला स्नेहांकित

राजगोपाल देवरा
सचिव

प्रति,
श्री.भारत शेंडगे,
राज्य संचालक,

प्रत,

१. मा.सचिव, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई.

२. विभागीय आयुक्त, (महसूल), पुणे /कोकण/औरंगाबाद/अमरावती/नागपूर/नाशिक.

३. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.

४. जिल्हाधिकारी, सर्व ..........................

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व ...................

६. अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर.

७. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सर्व.....................